# प्रकरण पहिले

# मराठी स्त्रियांचे राजकीय कार्य

## अ) प्राचीन महाराष्ट्रातील व हिंदुस्थानातील मराठी स्त्रियांचे राजकीय कार्य

## ब) उर्वरित भारतातील मराठी स्त्रियांचे राजकीय कार्य

### अ)प्राचीन महाराष्ट्रातील व हिंदुस्थानातील मराठी स्त्रियांचे राजकीय कार्य

आपल्या देशात फार पूर्वीपासून स्त्रियांचा राजकारणात सहभाग राहिला आहे. वेदपूर्वकाळ, वैदिक काळ, स्मृती व आर्षमहाकाव्यांचा काळ आणि आधुनिक काळ अशा काळाच्या चार भागात स्त्रियांच्या समाजातील स्थानात स्थित्यंतरे झाली.

वेदकाळात अनेक विदुषी होऊन गेल्या. त्यात घोणा, लोपामुद्रा, विश्ववारा, उर्वशी, यांच्यासारख्या प्रमुख विदुषींचा विचार करावा लागेल. गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी या विद्वान स्त्रिया ऋषी समवेत खंडनमंडन करीत असत. त्या काळात स्त्रिया राजकारणाचाही चतुराईने अभ्यास करीत.

महाराष्ट्रात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीच्या दृष्टिने चांगली प्रगती झाली. झाशीच्या राणी लक्ष्मीबाई पासून स्त्रियांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग सुरू होता.

एकूण स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय राहिला आहे. महात्मा गांधींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन मोठ्या संख्येने स्त्रिया स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्या. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या चळवळीतही स्त्रियांचा सहभाग होता.

विसाव्या शतकात जगाच्या राजकारणात फार मोठ्या प्रमाणात बदल झाले. या काळात दोन मोठी महायुद्धे झाली. १९व्या शतकात मतदानाचा अधिकार मर्यादित होता. स्त्रियांना मतांचा अधिकारच नव्हता.

इंग्लड व अमेरिका या प्रगत राष्ट्रांत १९१८ नंतर मतदानाचा अधिकार मिळाला व त्यानंतर राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. १९५० नंतर महिलांचा जागतिक राजकारणावर प्रभाव दिसून येतो. त्यात प्रामुख्याने सीरिमाओ, भंडारनायके, गोल्डा मायर, इंदिरा गांधी, मार्गारेट थॅचर, बेनझीर भुत्तो, चंद्रिका कुमारतुंगा, शेखहसीना बेगम, बेगम खलिदा झिया यांचा समावेश होतो.

जगातल्या प्रगत राष्ट्रांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. प्रतिक्षा करावी लागली त्या मानाने भारतात स्वातंत्र्याबरोबरच घटनेने महिलांना मतदानाचा अधिकार मिळवून दिला. परंतु त्याआधी शिवकालीन काळाचा आढावा घ्यावाच लागेल. हिंदू पदपातशाहीची स्थापना करण्याची आकांक्षा ज्या जिजाबाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात निर्माण केली. त्या जिजाबाई चिंतनशील व सुविद्यच असल्या पाहिजेत. पतीच्या निधनानंतर सती न जाता सासऱ्यांच्या आज्ञेनुसार राज्याची सर्व प्रकारची व्यवस्था चोखपणे पाहून समाजाला अभय देणारी व शत्रूला भयचकीत करणारी देवी अहिल्याबाई होळकर अग्रस्थानी मानल्या जातात. महाराष्ट्रामध्ये ज्याa महनीय, कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या, त्यात नायनिका किंवा नागनिका, सातवाहन सम्राट यांची पहिली पत्नी राणी प्रभावती गुप्ता, चांदबीबी, उमाबाई दाभाडे इत्यादींची गणना करावी लागेल.

या नंतरचा काळ इंग्रजी आक्रमणाचा आहे. त्यात झाशीच्या संग्रामाच्या काळात कॅप्टन लक्ष्मीसारख्या कस्तुरबाजीसारख्या अनेक स्त्रियांनी आपले राजकीय विचार स्पष्ट व निर्भिडपणे मांडले. विजयालक्ष्मी पंडित व सरोजिनी नायडू सक्रिय राजकारणात आल्या आणि त्यांनी राजकारणाची प्रतिष्ठा वाढवली. त्यांच्या मातृहृदयाचा अविष्कार त्यांच्या लेखणीतून व भाषणातूनही कळतो, आढळून येतो.

१९१७ साली मार्गारेट कर्झनच्या प्रेरणेने महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. नंतर निवडणूक लढविण्याचा लढा सुरू केला. यासाठी डॉ. सरोजिनी नायडू, ॲनी बेझंट, श्रीमती टाटा यांनी विशेष प्रयत्न केले. आणि त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले. १९२६ साली प्रथमच निवडणूक लढविण्याचा स्त्रियांना हक्क मिळाला.

---

(गवाणकर रोहिणी :'मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप', एक्सप्रेस पब्लिशिंग, कोल्हापूर, पृ. १११ ते ११७)

स्त्रीची चळवळ किंवा स्त्री-विमोचन मुक्ती ही नुसती जनजागृती नाही. कृती व विचार या दोन्हींचा यात समावेश आहे. म्हणूनच या चळवळीचे मोल निराळे, महत्त्व निराळे, विशेष असे आहे.

## १) झाशीची राणी

इ.सन. १८१८ ला पेशवाई बुडाल्यावर दुसरा बाजीराव ब्रह्मवर्तास गेले. तेव्हा त्यांच्याबरोबर महाराष्ट्रातून जे लोक गेले त्यात मनुताई (मणिकर्णिका) ऊर्फ लक्ष्मीबाई गंगाधर नेवाळकर या ही होत्या. झाशीच्या सुभ्याचे मालक 'गंगाधर राव नेवाळकर' यांच्याशी राणी लक्ष्मीबाईचा विवाह इ.स. १८४२ ला झाला.

लक्ष्मीबाई व गंगाधररावांनी दामोदर नावाचा मुलगा दत्तक घेतला होता. २१ नोव्हेंबर १८५३ ला गंगाधर पंतांचा मृत्यू झाला. डलहौसीने विधवा झालेल्या राणीचा दत्तकवारस इ.स. १८५४ ला नामंजूर करून झाशीचे राज्य खालसा केले.

गव्हर्नर कनिंगने राणीला पकडण्यासाठी (सर ह्यू रोज) ला झाशीला पाठवले. त्याने २५ मार्च, १८५८ ला वेढा देऊन युद्धास प्रारंभ केला. "मेरी झांशी नही दूंगी" अशी राणीने घोषणा केली. राणीने दत्तक मुलाला पाठिशी बांधून घोड्यावरून शिपायांसह ती २४० कि.मी.

अंतर असलेल्या काल्पी येथे आली. काल्पीला कर्नल स्मिथने वेढा घातला, तेव्हा राणी अत्यंत शौर्याने लढली. तेथून ती ग्वाल्हेरला गेली. इंग्रजांनी ग्वॉल्हेरलाही वेढा घातला. दोन इंग्रजांनी तिचा पाठलाग केला. ग्वॉल्हेर जवळील सोनरेषा नाल्यात तिचा घोडा अडला, पण युद्धकौशल्याने राणीने त्या दोघांना ठार केले. परंतु त्यात ती गंभीर जखमी झाली. आणि १८ जून १८५८ ला तिने जगाचा निरोप घेतला. नेहमी पूजेअर्चेत लीन असलेली लक्ष्मी झाशीच्या बचावासाठी लढाऊ बनली व शेवटपर्यंत लढत राहीली.

स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा विचार करताना, स्वातंत्र्य लढ्यापासून सुरूवात करावी लागते. त्यात प्राधान्याने उल्लेख करावा लागेल तो झाशीच्या राणी लक्ष्मीबाईचा. १८५७ च्या लढ्यात राणी लक्ष्मीबाईंनी दिलेला लढा हे स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातले सुवर्णपान आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाईंनी  झाशीची सुरक्षा सुदृढ करण्याचे प्रयत्न केले. स्वयंसेवकांची सेना तयार केली. उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांचे अंगरक्षक हिंदू - मुसलमान सैनिक होते. पुरूषांच्या बरोबर महिलांनाही त्यात भरती करून त्यांना प्रशिक्षण दिले. महिला तुकडीची एक अधिकारी झलकारी बाई होती. जिने झाशीच्या राणीचे प्राण वाचवण्यासाठी आपले प्राण खर्ची घातले. झाशीच्या राणीने तात्या टोपे यांच्या सहकार्याने आपले सैन्य संघटित केले. त्यांनी लढाई जिंकण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. रणभूमीत लढता लढता वीरगती प्राप्त केली.

कवयित्री सुभद्रा कुमारी चौहान यांनी त्यांचे शौर्य आपल्या एका कवितेत या प्रकारे केले आहे.

**चमक उठी सन सत्तावन मे**
**वह तलवार पुरानी थी**
**बुंदेले हरबोले के मुँह**
**हमने सुनी कहानी थी।**
**खूब लडी मरदानी, वह तो**
**झाशी वाली रानी थी।**

---

(संपा. मनजीतसिंह, समाजकल्याण : केंद्रीय समाजकल्याण बोर्ड (महिला एवं बालविकास मंत्रालय, भारत सरकार पत्रिता, अगस्त २०१५ पृ. ८,९)

## २) जिजामाता

जिजाबाईंनी दिलेल्या संस्कारांमुळेच शिवाजीराजे घडले. जिजाबाईंनी नुसत्याच गोष्टी सांगितल्या नाहीत, तर सदरेवर शेजारी बसवून राजकारणाचे पहिले धडेही दिले.शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीतीही शिकविली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वत: बारकाईने लक्ष ठेवले. शहाजीराजांची कैद व सुटका, अफझलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगांत शिवरायांना जिजाबाईंचे मार्गदर्शन लाभले. शिवराय मोठ्या मोहिमांवर असताना, खुद्द जिजाबाई राज्यकारभारावर

बारीक लक्ष ठेवत असत. आपल्या जहागिरीत त्या जातीने लक्ष घालत. सदरेवर बसून स्वत: तंटे सोडवत.

## ३) अहिल्याबाई होळकर –

अहिल्याबाई एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच, पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला.

ज्याप्रमाणे अकबर हा पुरुषांमधला उत्तम राजा तसेच अहिल्याबाई ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. जिच्या चांगल्या बुद्धीचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते; अशी अहिल्याबाई ही एक महान स्त्री होती. आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्याबाईंनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती.अहिल्याबाई होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या.

भारत स्वतंत्र झाल्यावरही पुढील अनेक वर्षे शेजारील भोपाळ, जबलपूर किंवा ग्वाल्हेर या शहरांपेक्षा इंदूर सर्व बाबतीत प्रगतीशील राहिले. याच्या मागे अहिल्याबाईंची दूरदृष्टी होती

## ब) उर्वरित भारतातील मराठी स्त्रियांचे राजकीय कार्य

## १) श्रीमती दुर्गाबाई देशमुख

भारताच्या घटना समितीत १५ स्त्रियांचा समावेश होता. या सर्वजणी विदुषी म्हणाव्या अशाच होत्या. अभ्यासूवृत्ती, निर्भीडपणा या गुणांमुळे या महिलांनी घटना समितीचे प्रभावी नेतृत्व केले. ज्यांनी महिलांचे प्रश्न व त्यांची सामाजिक बाजू व कायदेशीर गोष्टी यावरील चर्चेत खूपच योगदान दिले. दुर्गाबाई देशमुख १९४६ मध्ये घटना समितीच्या सदस्या म्हणून निवडून आल्या. पंडित नेहरू, गोपालस्वामी अय्यंगार, बी.एन.राव अशा दिग्गज नेत्यांबरोबर त्यांनी काम केले. घटना समितीच्या स्टिअरिंग समितीच्या त्या सदस्या होत्या. त्यांनी घटनासमितीत

.............................................................................................................

संपा. मनजीत सिंह, समाजकल्याण : केंद्रीय समाजकल्याण बोर्ड (महिला एवं बालविकास मंत्रालय, भारत सरकार की मासिक पत्रिता, अगस्त २०१५ पृ. १४,१५

---

७५० दुरूस्त्या मांडल्या. जे हिंदू कोड बिल पास झाले, त्यात आकार देण्यात दुर्गाबाईंचा महत्त्वाचा वाटा होता. त्या घटना समितीत वारंवार प्रश्न व मुद्दे उपस्थित करत असत. अशा एका त्यांच्या मुद्द्यांवर डॉ. आंबेडकर वैतागले म्हणाले,

"Here are women with a bee in her hornet डॉ. आंबेडकर स्त्रियांची females, women and ladies" अशी वर्गवारी करीत. दुर्गाबाईंना त्यांनी women वर्गात बसविले होते. प्लॅनिंग कमिशन व घटना समिती या विषयावर त्या परखड विचार मांडीत असत. ती आंध्रकन्या व महाराष्ट्राची स्नुषा १९८१ साली मृत्यू पावली.

ज्यांनी रणभूमीमध्ये हातात तलवार घेऊन शत्रूचा सामना केला, युद्ध केले तेच स्वातंत्र्यसैनिक म्हणता येणार नाहीत. तर स्वातंत्र्य सैनिकांच्या श्रेणीमध्ये या सर्व व्यक्ती येतील ज्यांनी प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष रूपात इंग्रजांना भारत सोडण्यास भाग पाडले. मग ते क्रांतिकारकांना गुप्त पत्र पोहचवायचे काम करणारे असो, घरा- घरात जाऊन देणगी वसूल करून धनरूपाने क्रांतिकारकांची मदत करणारे असो, आपल्या मुलांना इंग्रजांच्या दास्यातून मुक्ती मिळण्याची शिक्षण देणारे असो, अस्पृश्यता मिटवण्यासाठी काम करणारे असो सर्वच अप्रत्यक्षरित्या स्वातंत्र्यलढ्यात योगदानच करत होतो.

म.गांधीजींचे आवाहन स्विकारून हजारो स्त्रिया स्वातंत्र्यलढ्यात सामील झाल्या होत्या. दुर्गाबाई देशमुखांच्याही मनात गांधीजींचे आवाहन चांगले घर करून बसले होते. त्यांच्या मते इंग्रजी भाषा म्हणजे आपल्याला गुलाम बनविणारी भाषा.

हिंदी आपली राष्ट्रभाषा म्हणून हिंदी शिकवण्यासाठी त्यांनी शाळा उघडण्याची व्यवस्था केली. स्त्रियांना आपली मातृभाषा व राष्ट्रभाषा शिकण्यास प्रोत्साहीत केले. काकीनाडातील बहुतेक महिला बुरखा घालत. त्या सतत आपल्या घरातच राहत होत्या. त्याचप्रमाणे तिथे समाजापासून वेगळ्या केलेल्या देवदासी स्त्रिया सुद्धा होत्या. त्यांची ती दयनीय स्थिती पाहून दुर्गाबाई देशमूख खूप दुःखी व्हायच्या, या अनिष्ट प्रथांपासून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी त्यांनी स्त्रियांना मोठ्या प्रमाणात शिक्षित करण्यास सुरूवात केली.

मिठाच्या सत्याग्रहासाठी एक सेवादल चेन्नईहून निघाला होता. त्यामध्ये आपल्या आईसोबत दुर्गाबाईंना कैद करण्यात आले. १९३३ मध्ये जेलमधून बाहेर आल्यावर त्यांनी इंग्रजी – शिकण्यास सुरूवात केली. त्याकाळात चेन्नईमध्ये मॅट्रीक परिक्षेसाठी विद्यालयीन शिक्षण घेणे आवश्यक होते. पण काशीमध्ये तशी व्यवस्था होती. म्हणून त्यांनी बनारसहून मॅट्रीक परीक्षा पास करून पुढील शिक्षण घेतले. बी.ए. (ऑनर्स)आणि राज्यशास्त्रात एम.ए. डिग्री घेतली. कायद्याचा अभ्यास करून बी.एल. पास झाल्या.

इ.स. १९३७ मध्ये आंध्र महिला सभेची स्थापना केली. दिल्लीत त्या अंधव्यक्तींच्या संघाच्या अध्यक्षा होत्या. संसदेच्या सदस्य असताना त्यांनी अंधांसाठी खूप कायदे तयार केले. त्यांच्याच प्रयत्नांनी १९५३ मध्ये केंद्रीय समाज कल्याण बोर्डाची स्थापना झाली आणि त्या ह्या बोर्डाच्या पहिल्या अध्यक्षा बनल्या.

## २) श्रीमती सुचेता कृपलानी

सुचेता कृपलानी या बंगाल विधानसभेतून निवडून घटना समितीवर आल्या. अत्यंत निर्भीड, जबाबदार व्यक्तिमत्व त्यांचे होते. प्रसंगी घटनासमितीत नेहरूंनाही त्यांनी सुनावले होते. १४ ऑगस्ट १९४७ मध्ये घटना समितीच्या सदस्य म्हणून निवडून आल्या. पंडित नेहरू.

गोपाल स्वामी अय्यंगार, बी एन.राव अशा दिग्गज नेत्यांबरोबर त्यांनी काम केले. घटना समितीच्या, स्टिअरिंग समितीच्या त्या सदस्या होत्या. त्यांनी घटनासमितीत ७५० दुरूस्त्या मांडल्या. जे हिंदु कोड बिल पास झाले, त्याला आकार देण्यात दुर्गाबाईंचा महत्त्वाचा वाटा होता.

## <u>३) श्रीमती हंसा मेहता</u>

हंसा मेहता या मुंबई व गुजरात मधून घटना समितीवर पोहोचलेली एकुलती एक महिला. लंडनमध्ये पत्रकारितेचा अभ्यास करायला गेल्या असता, सरोजीनी नायडूंशी परिचय व मैत्री झाली. मुंबई लेजिस्लेटीव्ह काऊंन्सीलवर त्या निवडून गेल्या. १४ ऑगस्टच्या मध्यरात्री हिंदी स्त्रियांनी स्वतंत्र भारताचा ध्वज आपल्या प्रतिनिधी म्हणून राजेंद्र प्रसादांच्या हस्ते राष्ट्रार्पण करण्याची जबाबदारी हंसा बेन यांनी पार पाडली. भारताची जी घटना झाली, त्यावर मोजक्याच सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. हंसा बेन त्यातील एकमेव महिला होत्या.

घटना समितीत विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू यांनी महिलांना आरक्षण देण्याविषयी आपले परखड विचार मांडले. याबाबत सरोजिनी नायडू डॉ. आंबेडकरांना म्हणाल्या, “आज पर्यंत कर्तृत्ववान स्त्रीला कुठेही संधी दिली गेली नाही असे घडलेले नाही,आमचे नेते व कार्यकर्तेही महिलांची योग्यता ओळखतात. त्यामुळे अशाप्रकारे कायद्याने कृपा करून महिलांना आरक्षण दिले, तर कदाचित त्यांच्यातील जिद्द संपेल.”

## ➢ महाराष्ट्रातून इतर राज्यात लग्न होऊन गेलेल्या आणि राजकारणात चमकलेल्या स्त्रिया

उर्वरित भारतातील मराठी स्त्रियांचे राजकीय कार्य यात महाराष्ट्रातून इतर राज्यात लग्न होऊन गेलेल्या तसेच मूळ महाराष्ट्रातील परंतु अनेक पिढ्या इतर राज्यात स्थायिक झालेल्या, अशा काही महिला ज्यांनी राजकारणात आपली चमक दाखवली आहे.

### <u>१) श्रीमती सुमित्रा महाजन</u>

महाराष्ट्रातून इतर राज्यात लग्न होऊन गेलेल्या, तसेच त्या राज्यात पूर्वीपासून स्थायिक असलेल्या ज्या महिला राजकारणात चमकल्या आहेत, यापैकी पहिले नाव आहे आजच्या लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन, ज्यांचे कोकणातील चिपळूण हे माहेर आहे. सुमित्रा साठे लग्नानंतर सुमित्रा महाजन झाल्या. महाजन इंदौरला स्थायिक होते. लग्नानंतर त्या राजकारणात आल्या. इंदौर महानगरपालिकेत नगरसेविका झाल्या. इंदौरच्या महापौर बनण्याचा मानही त्यांना मिळाला. त्या महापौरपदाचे त्यांनी चीज केले. इंदौर महानगरीचा कायापालट केला. याचीच फलनिष्पत्ती अशी झाली की, इंदौर लोकसभेच्या निवडणूकीची उमेदवारी त्यांना मिळाली व प्रचंड मतांनी त्या निवडून आल्या. तेव्हापासून आजपर्यंत ९ वेळा खासदार होण्याचा मान त्यांनी प्रस्तापित केला. गिनीज बुक रेकॉर्डमध्ये त्यांची नोंद झाली. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळातही त्यांनी महिला बालकल्याण मंत्री (कॅबिनेट) म्हणून खूप चांगले काम केले आहे आणि आता या लोकसभेच्या अध्यक्षा आहेत.

अध्यक्षपदाच्या खुर्चीचा जणूकाही त्यांच्या अध्यक्षतेमुळे सन्मान झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण अत्यंत मृदू भाषेत चेहऱ्यावरील गोड स्मित ढळू न देता, तितक्याच ताकदीने सभागृहावर नियंत्रण ठेवतात. योग्य ठिकाणी योग्य निर्देश देणे, हा त्यांचा हातखंडा आहे. जेव्हा त्या प्रवचन करायच्या किंवा सभेतले भाषण असेल वा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन असेल त्यांची मधुर वाणी सर्वांना मंत्रमुग्ध करणारी असते. त्यांचा साहित्याचा अभ्यास व पौराणिक ग्रंथाचे वाचन अगाध आहे.

विविध प्रकारचे उपक्रम राबवणे हा त्यांचा स्वभाव आहे. याचीच प्रचिती मार्च ५ व ६ ला आली. सुमित्राजींनी ५ व ६ मार्चला शंभरातील सर्व पक्षाच्या महिला आमदार व खासदारांचे सेमिनार घेतले होते. मला वाटते देशात प्रथमच असा हा प्रयोग झाला असेल, ज्यात सर्व पक्षीय महिला आमदार, खासदार एकत्रित कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. पक्षभेद विसरून गप्पागोष्टी करत होत्या. पक्षभेद न मानता, सर्व पक्षीय महिला आमदार, खासदारांना एकत्र आणून, महिला या नात्याने विविध विषयांवरील त्यांचे ज्ञान, दृष्टिकोण अभ्यास, महत्त्वाकांक्षा उजागर करण्याचे उत्तम काम या माध्यमातून त्यांनी केले. तसेच त्यासंबंधी विविध विषयांवर सत्रांचे आयोजन केले होते. त्यातील एका सत्राचे अध्यक्षपद पूर्व लोकसभा अध्यक्षा मीर कुमारजी यांनी भूषवले होते. दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षा दिल्लीच्या पूर्वमुख्यमंत्री शिला दीक्षित होत्या. यांच्याद्वारे महिला लोकप्रतिनिधी आपापली मते मांडली. या सेमिनारसाठी देशभरातून एकूण २६२ आमदार, ९६ खासदार, १ महिला मुख्यमंत्री (गुजरात) महिला राज्यपाल, ७ केंद्रीय महिला मंत्री सम्मिलित झाल्या होत्या. सेमिनारचे उद्घाटनराष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांनी केले, तर समारोप पंतप्रधान नरेंद्र मोदी, पूर्व राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी केला. अर्थात सुमित्राजींचे दोन्ही वेळा भाषण झाले, सर्व महानुभावांनी सुमित्राताईंचे या प्रयोगासाठी अभिनंदन केले. एक मराठी स्त्री राजकारणात आपल्या प्रतिभेने अटकेपार झेंडा रोवते, हे महाराष्ट्राला नक्कीच भूषणावह आहे.

## २) <u>श्रीमती वसुंधरा राजे सिंधिया</u>

दुसरा क्रमांक लागतो, तो वसुंधराराजे सिंधिया यांचा. ज्या सध्या राजस्थानच्या दुसऱ्यांदा मुख्यमंत्री आहेत. वसुंधराराजे मूळ महाराष्ट्रीयन आहेत. सातारा जिल्ह्यातील कन्हेर गावच्या त्या कन्या आहेत. सिंधिया नव्हे शिंदे आहेत. तीन वेळा खासदार आणि तीन वेळा आमदार, दुसऱ्यांदा मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास आहे. खासदार असताना मा. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्या कॅबिनेट मंत्री होत्या. तडफदार, बाणेदार व्यक्तिमत्व, राजघराण्याची शान, छाप त्यांच्या व्यक्तिमत्वात पदोपदी जाणवते. राजस्थानमध्ये दोन वेळा मुख्यमंत्री म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. विदेशात शिक्षण घेतलेल्या वसुंधराजी मराठी भाषा अस्खलित बोलतात. बेधडक निर्णय घेणे, सर्वसामान्यांमध्ये मिसळणे, प्रत्येक समाजाला त्या आपल्याच नेत्या वाटतात. आजही त्या मुख्यमंत्रीपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. विदेशात शिकूनही मातीशी नाते घट्टपणे टिकवण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.

### ३) **श्रीमती यशोधरा शिंदे**

तिसरा क्रमांक लागतो तो, यशोधरा शिंदे (सिंधिया) मध्यप्रदेश मध्ये पाचव्यांदा आमदार आहेत. उमा भारती मुख्यमंत्री असतांना त्या त्यांच्या मंत्रीमंडळात मंत्री होत्या. आजही त्या शिवराज सिंह यांच्या मंत्रीमंडळात मंत्री आहेत. वसुंधरा राजेंच्या त्या भगिनी आहेत. विधानसभा क्षेत्रातले उल्लेखनीय काम त्यांना सातत्याने निवडून देत आहे. दांडगा जनसंपर्क, प्रश्नांची जाण, समस्या सोडविताना आवश्यक त्या गोष्टींचा पाठलाग करणे, जनतेच्या सुख-दुःखाशी समरस होणे, स्त्रियांना संघटित करून, चर्चेला वाव देणे. अत्यंत मृदुभाषी, मनमिळाऊ स्वभावाच्या सभागृहात तितक्याच त्या तडफदार पणे वावरतात.

### ४) **श्रीमती अर्चना चिटणीस**

चौथ्या आहेत अर्चना चिटणीस, उत्तर महाराष्ट्रातल्या अर्चना चिटणीस लग्न होऊन मध्यप्रदेशात गेल्या. समाजकार्य, साखरकारखाना करत करत त्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या. आमदार झाल्या व मंत्रीही झाल्या. राज्यमंत्री म्हणून त्यांनी चांगले काम केले. उत्तम वक्ता, विषयांची खोली यामुळे त्यांचेही व्यक्तिमत्व इतरांवर प्रभाव टाकते. आजही त्या आमदार आहेत. मूळात संघटनेतून आलेल्या, आंदोलनांमध्ये सहभागी झालेल्या त्या आहेत. महिला बालकल्याण मंत्री या नात्याने महाराष्ट्र प्रदेशमध्ये उत्तम कामगिरी केली होती. त्यांना मराठी भाषेतच बोलायला फार आवडते.

कर्नाटक, गुजरात, आंध्र या राज्यांमध्ये अनेक मराठी तरूण स्त्रिया, पंचायत समिती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये या तीन राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मराठी भाषिक महिलांचे निवडून येण्यात मोठा आकडा आहे. सुरत लोकसभा मतदारसंघात दोन मराठी मुली यावेळी आमदार झाल्या आहेत.

सुरत मध्येही मराठी महिला विधानसभेत निवडून आल्या आहेत. कर्नाटकातही बेळगाव, निपाणी याठिकाणी मराठी महिला लोकप्रतिनिधींच्या रूपात पहायला मिळतात व सीमावादावर बोलताना दिसतात. आज बेळगावला मराठी महिला महापौर आहे.